# अनोळखी पदराग

## सुनंदा भोसेकर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४२८

REFBK-0023118
REFBK-0023118

# अनोळखी प्रदेशात

सुनंदा भोसेकर

REFBK-0023118
REFBK-0023118

ऋचा प्रकाशन
सोनोरी, ३६ चरई, ठाणे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या
अनुदानाने प्रकाशित

प्रकाशन-दिनांक : २९ फेब्रुवारी १९८०

© १९८०, सुनंदा भोसेकर

मुखपृष्ठ : वासंती मुझुमदार

प्रकाशक :
अरुंधती पानसे
ऋचा प्रकाशन
सोनोरी, ३६ चरई
ठाणे ४०० ६०१

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत ५ रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

*ती. अण्णा*
*आणि*
*सौ. आई*
*यांच्यांसाठी*

७ प्रवासाच्या कविता

१७ महानगर

२३ तुझ्यासाठी काही कविता

२८ अनोळखी प्रदेशात

३६ संवाद

. १ .

हिमार्त वादळी पानझडींचे हिशेब आठवत
आपण आपले विश्वरहस्यासारखे
घोर एकांतिक होऊन जावे, हेच बरे.

हाडे खिळखिळी झालेली असताना
भोवतालच्या असंख्य कबरींना
पलीकडच्या टेकाडापर्यंत
खेचून नेणे कसे शक्य आहे ?

शिवाय, मध्येच आ वासून
अस्ताव्यस्त पसरलेले हे माळरान...
इतका मोठा हिरवा गालिचा विणेन
असे मी कुणालाच कधी कबूल केले नव्हते.

हाडांना पडलेल्या भोकांमधून
माझी जिगीषा
हलके हलके पाझरून
जमिनीत विरून जात आहे.

काळ्या घोडेस्वारांनी
घोड्यांच्या शेपटीला बांधून येथे आणले
तेव्हापासून शरीराची ही फरफट...
आता कातडी पूर्ण सोलून निघाल्याशिवाय
येथून सुटका नाही.

असे असताना
हिमार्त वादळी पानझडींचे हिशेब आठवत

आपण आपले विश्वरहस्यासारखे
घोर एकांतिक होऊन जावे, हेच बरे.

. २ .

निर्विकार मानवी आकृतींचे सांगाडे
जर झाडाझाडांवरून लटकावून दिले
तर कुणालाही भीती वाटणे
सहाजिकच आहे!
—या शहरातले तमाम रस्ते
तसेच भयप्रद आहेत.

माझ्या तळहातावरील रेषा खरवडून
मी एक मार्ग तयार केला आहे
ज्यायोगे आपण शेवटपर्यंत पोहचू शकू.
—म्हणजे कुठे?

अग्निमण्यांच्या शोधात
पृथ्वीच्या पाठीवरल्या कुठल्याही प्रदेशातून
प्रवासी निघाले,
तरी ते शेवटी
असंख्य चंद्र जेथे दररोज कोसळून पडतात
त्या घोर शोकदरीपाशीच
येऊन पोहोचतात. हमखास.

माझी स्मृती नष्ट होण्याच्या आत
मला ह्या शहरातल्या
प्रचंड कोलाहलापासून दूर गेलेच पाहीजे.

भर पावसात एकाकी जळणाऱ्या
घराच्या अंगणातली फुले
मी कुणासाठी जपून ठेवू !

. ३ .

वाळवंटातल्या
जळजळत्या, निश्चल उन्हातून चालताना
केस पांढरे होऊन जातील,
हे मला माहीतच होते.
...प्रथम सूक्ष्म भय वाटायचे
मस्तकापासून पायापर्यंत
हलके हलके पसरत जाणारे...

एकदा उत्तररात्री, स्वप्नात
चक्राकार संगमरवरी जिन्याच्या वरच्या टोकाशी
उभ्या असलेल्या तुझ्या
काळ्याभोर केसांच्या लाटा
माझ्या शरीराच्या किनाऱ्यांपर्यंत येऊन थडकल्या,
आणि सगळे भय
विझून विझून गेले. आतपर्यंत...

अंगांगावर गाठी गाठी असलेला
तो फुलारलेला चाफा
खरे-खोटे करायचे तर म्हणणार नाही ना !

माझ्या पायाला पडलेल्या भेगांमधून
झरणाऱ्या रक्तामुळे
वाळू ओलसर होते आहे.

असो.
निदान तेवढा तरी ओलावा.

. ४ .

जिवाच्या आकांताने करकरत,
आतून उमाळून येऊन
ती सुळासकट उन्मळून पडली...
—बर्फगार टेकड्यांवर खेळतात
त्या खेळाचे नावसुद्धा मला माहीत नाही.
आपली बुबुळे तळहातावर काढून घेऊन
मी खोलवर तपासले की
आपल्याला तिच्याविषयी काय वाटते आहे...
—मी अशा प्रांतात वाढले
की मला निसर्गाच्या
रौद्ररूपाचेच आकर्षण वाटावे...

मी पुष्कळ पाठ फिरवून
चालायला सुरवात करीन
पण समुद्राच्या आंधळ्या लाटा
पाठीमागे वाळवंटातसुद्धा येणार नाहीत
असे कुठे आहे!

. ५ .

टेकडीच्या माथ्यावर वाहणाऱ्या वाऱ्यासारखे
भणाण उधळून
स्वतःच्या हाडांचे फासे,
प्राणांची बाजी लावून, खुळखुळवून

मी समोरच्या
नदीकाठच्या वाळवंटात फेकते आहे...
—मावळत्या उन्हात
दोन्ही बाजूंच्या, घनदाट झाडांच्या
अंगांगावर लपेटत जाणाऱ्या नारिंगी ज्वाळा
तळहातावर अलगद फुलारून येतात
प्रसन्न कृष्णकमळांसारख्या...
—पलीकडच्या जंगलातून
उमद्या, पांढऱ्याशुभ्र घोडयांची गाडी
पुलावरून सुसाट टपटपत जाते.
असल्या गोष्टींचा
खालच्या मऊसर वाळूशी
काही एक संबंध असत नाही.
—ती ओंजळभर कृष्णकमळे
मी तुझ्याही ओंजळीत
अलगद ठेवून देईन एकदा;
पण तोपर्यंत पुन्हा एकदा
जीवाच्या आकांताने फासे खुळखुळवून
मला फेकलेच पाहिजेत.

पलीकडल्या जंगलातला
थरार वारा
पर्वतांच्या खांद्यावर बसून कुजबुजतो
त्याची ही गोष्ट.

. ६ .

एकेकदा माझी नखं
अतोनात वाढत जातात

हिंस्रपणा नुस्ता अंगभर
धुमसत धुमसत रहातो—
अंगावरच्या पायघोळ झग्याच्या खिशात
पृथ्वीला लावायची तरफ टाकून
मी तोंडाने विश्वात्मक शांततेविषयी
प्रवचने देत हिंडते...
॥ सहज शक्यतेनुसार
लोकलमध्ये खिसा कापला जातो ॥

परवाच, डोक्यावरचा काळ्या केसांचा टोप विकून
मी एक बासरी घेतली.
लखलखत्या सुरांचे खंजीर उरात जडवून
पुन्हा शांततेविषयीच्या प्रवचनांना सुरवात—
॥ आता झग्याला खिसेच नाहीत
जसे की, हातांना बोटेच नाहीत ॥

. ७ .

भुरभुरणाऱ्या पिवळ्या गवताच्या माळावर
मी आपल्या पांढऱ्या केसांमधले
सर्व शहाणपण पुरून टाकले.
जरा पुढे जाऊन
बर्फात एक विहीर खोदली,
आपल्याच घनदाट पापण्या कापून
त्या विहिरीत गाडून टाकल्या
आणि रक्ताच्या थेंबाथेंबात जागणाऱ्या स्वप्नांची
त्यावर एक सुबक समाधी बांधली.

इतक्यानेच काय झाले ?
—कासाराच्या दुकानामागे
ताटकळून ताटकळून जमवलेल्या
सर्व रंगीत काचा
परकराच्या घोळात पसरून
मी, पुढ्यात सांडलेल्या
अतोनात अहंकारी आकाशाच्या
मर्मस्थानाचा शोध घेत बसले...

असे सर्व झाले.
तरीही, समोरच्या भन्नाट रहदारीच्या रस्त्यावर
माझ्या मनातले कौलारू घर
कृष्णाकमळींच्या वेलींसह
वारंवार शांत चित्ताने उभे रहाते.

—मी पुन्हा पुन्हा बर्फात
विहीर खोदतेच आहे.

. ८ .

तर समग्र नश्वरतेसंबंधी काही
वैभवाच्या शिखरावर तळपत असलेली
महानगरे
बोल बोल म्हणता म्हणता
पृथ्वीच्या पोटात गडप होतात.

हे सर्व तत्त्वज्ञान
मी अखेर माझ्या मातीच्याच हातांनी
तुला सांगत आहे.

पुन्हा एकदा निघायची तयारी केली
नि पुराण्या फिड्ल्च्या तारा अचानक तुटल्या.
असे असताना
आपलीच घनदाट कातडी हाडांवर ओढून
आपण आपले विश्वरहस्यासारखे
घोर एकांतिक होऊन जावे हेच बरे.

# महानगर

.१.

शहराच्या असंख्य रस्त्यांवरून
गर्जत गर्जत चाललेल्या
माणसांच्या असंख्य मिरवणुका, जल्लोष...
प्रकाशाचे उत्सव...उत्सव...
शहराच्या दर्शनी भागात.

शरीराला न पेलवणारे शरीराचे विलास;
झाडे पार थकून थकून गेलेली...

.२.

मी बघते आहे
निद्रेतून हळूहळू जागे होणारे
आणि रात्रभर जागेच असलेले शहर...
निद्रिस्त वादळे
नसानसांत वागवणारे शहर...
—तिन्हीत्रिकाळ रस्ते
माना खाली घालून
निमूटपणे वहातच असतात.

.३.

'एअर पोल्यूशन' नावाचे एक चित्र
मी पाहिले होते
आकाशभर हलके हलके पसरत गेलेले
आणि पावसाळ्यात घनदाटपणे बरसलेले...

ही बोबडी बोलणारी पाखरे
आता एकमेकांना
त्याच्याच गोष्टी सांगत आहेत.

.४.

असंख्य आवाजांनी
मस्तक कोंदटून गेल्याची तक्रार
तुटपुंजी झाडे एकमेकांजवळ
किरट्या आवाजात करतात.

माझ्यावेळी दिवस असताना
आईच्या ओटीत
शहराने सेकंदकाटे घातल्याचे
मला रेल्वेलायनीशेजारच्या चाफ्यानेच सांगितले.

.५.

इमारतींच्या गजबजाटातून
उन्हाचे तुकडे
हट्टीपणाने लपंडाव खेळतात;
वहानांच्या आवाजाने वारंवार दचकणाऱ्या
मांजरीकडे बघून डोळे मिचकावतात.

आता रस्त्यावरून पावसाळी रात्र
सरपटत जात असताना
उन्हाच्या हट्टीपणाच्या कथा
मांजर आठवून आठवून पिलांना सांगत आहे.

.६.

माझा असा सिद्धांत आहे
की, शहर माणसांच्या रक्तात मुरत नाही.
उदाहरणार्थ,
गतजन्मीप्रमाणेच याही जन्मी

तो हातात तळपती तलवार घेऊन
अरबी घोड्यावर स्वार होऊन
तुफान दौडत दौडत येईल
असे मला
लोकलच्या घामट गर्दीतही वाटायचे...
प्राणात खोलवर वाजणाऱ्या
पावलांची शपथ.

.७.

डोळयादेखत होणारी पडझड
शांतपणे बघणे निराळे
आणि स्वतःच्या डोक्यावर
फाटकी छत्री घेऊन चालणे निराळे.

येणाऱ्या दिवसागणिक
शहरातल्या निर्वासितांनी कुठे जावे !
हा प्रश्न, माडाच्या झावळ्या
वाऱ्याची तार छेडता छेडता
अलगद गुलमोहरावर ढकलून देतात,
आणि तो बिचारा
उराउरी फुटत फुटत राहतो.

शहर निर्विकार.

.८.

समग्र शहर तारांकित.
सर्वत्र विजेच्या तारांचे जाळे.
तारांवर अनोळखी पक्षी

आणि माझ्याच मातीत मी परदेशी...
—माझ्या या अवस्थेच्या कारणमीमांसेशी
शहराला काही एक कर्तव्य नाही.

माझ्या ऋतूंच्या छिन्नभिन्न बहरयात्रा
तुटक्या आधारांसह
दिव्याच्या खांबांवर लोंबकळत असलेल्या...
आणि समग्र शहर तारांकित.

.९.

सुसाट वाऱ्याच्या झोतासरशी
हेलपाटणाऱ्या धुळीसारखी माणसे

असंख्य आघाड्यांवर
दमछाक झाल्यावर
हे असे प्रत्येकाचे
असण्या–नसण्याच्या
सीमारेषेवरती रेंगाळणे...
बंद मुठीत गच्च धरून ठेवलेली जिगीषा.

अलीकडे पलीकडे
कुठेही काहीही
फरक पडत नाही.

माणसांच्या अस्तित्वविषयक कल्पनांमध्ये
इतका हा क्रांतिकारक बदल
केवळ शहरामुळेच घडून आला.
तेव्हा त्याला कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार.

॥ काहीही विशेष नाही ॥

.१०.

एकाएकी अर्ध्या जगावर
उन्हे आरवतात
आणि हळूहळू तापत तापत
निःशब्द होऊन पडून राहतात
अस्तित्वाच्या अवशेषांवर...

गतिमान चक्राचे आरे मोजत मोजत
मी स्वतःला सातत्याने समजावीत असते
की पृथ्वी हा एक विकसनशील ग्रह आहे.
तीच कथा
तीव्र हिमवर्षावांच्या रात्रींची...
शहराच्या रस्त्यांवरून
सैरभैर होताना
मला एकदा तुकारामाची कविता सापडली.

समग्र आयुष्यात घडलेले
इतकेच महत्त्वाचे.

.११.

रक्तातल्या घनदाट जंगलांना
असंख्य वणवे लागले आहेत.

मोठ्या मुश्किलीने बचावून आहे
मी माझी कातडी.
आता हे सर्व मला
अनावर होते आहे.

वरूनही तीव्रतेने जाणवतात
रक्तातल्या झळाळत्या
मोरपिसांचे रत्नसंभार

जंगलाच्या ऐन मध्यावर असतो
तसला भयाण एकाकीपणा...

शहरात मी स्वतःला
वारंवार फाशी दिले.
—निदान आता तरी
झाडांना फुले येवोत.

# तुझ्यासाठी काही कविता

. १ .

भळभळत्या जखमांचे धनी आपणच असावे
नि या रक्ताच्या महासागरात अंग चिकट होऊन जावे
—वास यावा खाऱ्या पाण्याचा;
असे आयुष्याच्या प्रत्येक क्षणाक्षणावर ठोकलेले
आणि त्यावर तुझ्या सह्या...
मी किती बंड पुकारावे या अस्तित्वाविरुद्ध,
नि किती गुरफटून जावे या सापळ्यात...

. २ .

आता हाकारू नकोस रे
मला त्या अनाम वळणांवर...
मी स्वतःच नाकारते आहे ना सारे
होकारून, घडवण्याचे बळ सरल्यावरच हे सारे...

तरून जाऊ या महासागरातून
अशी आश्वासने देऊ नकोस;
नको फेकूस छापील अहवाल तोंडावर.
तळहातावर उरलेले रखरखीत सत्य
तुझ्या डोळ्यापल्याड उभे ठाकते...

. ३ .

अंधारात झाडांच्या आकृत्या;
पाखरांचा घुसमटलेला आवाज;
पाचोळयात पावले वाजतात.
अंगभर भयाची शिरशिरी...

तूच भरून राहिला आहेस
या साऱ्या विश्वात.

.४.

बंद दारांच्या पल्याड काय आहे
हे माहीत नसताना
ती ठोठावण्यात काय हशील ?
—ही कोवळी धून
मुळातच जन्माला आलेली नाही
आपल्या मातीत.

.५.

मी दडपून दडपून टाकते आहे
हाडात धुमाकूळ घालणारे उष्ण वारे...
आणि रक्तावर जमणारा वाळूचा थंड थर...
सोडव, सोडव रे...हे सहारा पुळ्यात...

.६.

सर्व वाद भरभराटीला येत असताना
एकदाही तू मला हळूवारपणे विचारले नाहीस
की 'तुला कुठली वस्त्रे नेसायला आवडतील,
नि कुठली तालवाद्ये—'
मग मला वेगवेगळे डास चावतात
म्हणून मी कशाला तुझ्याकडे तक्रार करू ?

.७.

हे पुसून टाक
माझ्या नजरेपुढचे हताश चेहरे
तुकड्यातुकड्यांनी बनलेले,
नाहीतर विझवून टाक
माझेच तुकडे तुकडे झालेले डोळे...

.८.

पृथ्वीच्या पाठीवर मोकाट फिरतात
त्या रणगाड्यांच्या चाकात
भरून राहिली आहे तुझीच शक्ती;
जी मनमोकळा वरवंटा फिरवते
माझ्या चेहऱ्यावरून
माझे हात आणि जीभ छाटल्यावर.
नि त्यालाच मी समजत राहते
माझ्या स्वातंत्र्याचे गाणे.

.९.

या क्षणाला जातिवंत चैतन्य भरशील तू माझ्या शरीरात
नि पुढच्याच क्षणाला तुझ्या मनात येईल
मला जिवंत जाळण्याचे
तरीही तुझ्या रुंद खांद्यांकडे मी बघते आहे
आधारासाठी.

.१०.

खोलीत मध्यभागी दिवा लावून
मी आठवत बसते तुझा चेहरा...

आणि नजरेसमोरून सरकत जाते
असंख्य चेहऱ्यांचे एकसंध आकाश—

संबंधांच्या गुंतवणुकीचा अपरिहार्य शेवट
हाताची बोटे तुटण्यात.

. ११ .

या समग्र असंतोषाचे मूळ
या हाडांना चिकटलेल्या कातडीतच आहे...

संपूर्ण साचा खिळखिळा होऊन गेला
तरी बहराची हलकी शीळ
राहत नाही मला चाळवल्याशिवाय...

. १२ .

क्षणाक्षणाला आटणाऱ्या रक्ताची
किंमत देऊन उभारलेले माझे आयुष्य
सहज चुरगाळलेस कागदाच्या कपट्यासारखे...
आता कशाला भीक मागतोस
माझ्या त्या अश्राप डोळ्यांची ?

. १३ .

पूर्ण सूड घेतल्यासारखे
आता माझे पुनर्वसन करशील
नि डोळ्यात बघत म्हणशील
"आता तरी समाधान झाले ना ?"

—सांडपाण्यात लक्तरे धुण्याचा उद्योग...

. १४ .

गात्रागात्रात सळसळणारा जगण्याचा आवेग
आणि या युगाची वेगवान साधने—
दोहोंच्यामध्ये फरपटून रक्त थंड पडले
की अडेल आयुष्य
जशी अडली आहे आता कविता...

. १५ .

तू म्हणजे माझ्या सृजनशक्तीला
सततचे आव्हान...
—नंतर ओसरून जातो सारा कैफ क्षणभरात...
कशाला जन्म देऊ
मी तुझ्या या अनंत रूपांना...

ज्या झाडांना मुळे नाहीत
त्यांना कसे समजतील
रक्तबंबाळ करणारे ऋतुचक्राचे फेरे...

. १६ .

चिरायू होवोत हे भेदाभेद नि संघर्ष
सरकू देत शतकामागून शतके...

आपल्या मनात असतो तोच खरा
आकड्यांचा अर्थ.

काळजी करू नकोस—
मी मुळीच अपील करत नाही
तुझ्या हातातून हात
सोडवून घेण्यासाठी.

. १ .

या अनोळखी प्रदेशात
आपण किती वेगाने भरकटत आलो!
येताना निदान
तुझी तरी सोबत होती...

तू म्हणतोस,
आपल्याला क्षितिजापलीकडच्या प्रदेशांची नावे,
त्यांचे धूसर असणारे नकाशे
स्पष्ट जाणवतात...
मग, आपल्याच प्रदेशाचे नाव सांगणारी
ही माणसांची जमात
अशी अपरिचित का वाटते...?
—त्यांचे कायदेकानून
आपल्यापेक्षा निराळे नाहीत...

. २ .

रक्तशोकापलीकडे उभ्या असलेल्या
सावळ्या सावल्यांचे गूढ
यांनाही उलगडलेले नाही,
आपल्यालाही नाही.
आपल्या प्रिय देशाचे
सुंदर निळे आकाश
धुराळ्याने आणि गडगडाटाने
भरून गेले होते,
ते दिवस तुला आठवतात का ?
—या अनोळखी प्रदेशाच्या
विधवेच्या कपाळासारख्या

फटफटीत आकाशाला
कोण कारण असेल ?

. ३ .

तापलेल्या वाळूतून निघणाऱ्या
उष्ण वाफाऱ्यांसारखे
माणसांचे निःश्वास
मला आता असह्य होतात रे!

काळ्या इमारतींवरून सरपटत जाणारी
म्लान उन्हाची लक्तरे याला साक्ष आहेत.

. ४ .

उंच झाडांच्या शेंड्यावर बसून
विजयाची ललकारी देणारे
पक्षी इथे नाहीत...
झाडेही फारशी उंच नाहीत.
दुपारच्या घामेजलेल्या उन्हात
घडे नुस्ती सरकत जातात
—दिशाहीन असल्यागत...
विजयाच्या ललकाऱ्या म्हणजे
हा नाक्यानाक्यावरचा कोलाहल नव्हे...
आपल्या आणि यांच्या कल्पना
एकच आहेत म्हणतोस,
मग हे कसे घडते आहे?

. ५ .

चित्रविचित्र कपडे करणारी,
ढोल बडवणारी ही माणसे
नरभक्षक नाहीत
असे तू पहिल्यापासून सांगत होतास,
मग पौर्णिमेच्या शुभ्रतम रात्री
समुद्राच्या ओढाळ गाजेने
यांचे हृदय उचंबळून येण्याऐवजी
यांच्या ढोलक्यांचाच ताल वाढत का जातो ?
आणि तांबारलेले डोळे
पेटल्यासारखे का दिसतात ?
माणसांच्या अंगभूत लयीच्या तीव्र नादाला
हे आवाहन खासच नव्हे !

. ६ .

पूर्वस्मृतींना उजाळा मिळावा
तसे हे आकाश फटफटीत होत आहे...
घननीळ पावसाळी रंग निवळला
हे चांगले झाले की वाईट ?
—कोणत्यातरी निर्णयाच्या तारेला
जडभारी होऊन लोंबकळण्याचा
मला आता कंटाळा आला आहे.
धाडकन्,
तळ्यात किंवा मळ्यात
उडी टाकून मोकळे व्हावेसे वाटते.
पण ही तारवटलेली तार...
अनादी. अनंत.

.७.

जड-आवाजात
तू संध्याकाळच्या प्रार्थना म्हणत असतोस
त्या स्वरांपासून
मी मैलोगणती दूर आहे रे!
अन् आता हे घणाघाती घंटानाद
मधला तरल दुवा सांधू शकणार नाहीत.

.८.

आपल्या दिवाणखान्यातल्या
प्रकाशित झुंबरात
मी माझा आत्मा टांगून ठेवते,
आणि लाटालाटांवर तरंगणाऱ्या
चेहऱ्याच्या प्रत्येक कणाने
तो शोषून घेण्याचा तुझा प्रयत्न...
एकदा एकरूपत्वाच्याही पलीकडे गेलेल्या
जीवांची ही अशी स्थिती...
—मी हल्ली कसलीच फुले
माळत नाही रे!

.९.

रस्त्याच्या पलीकडल्या वळणावर
आपण घर बांधायला घेतले,
तेव्हा लावायच्या ठरलेल्या झाडांची यादी
अद्याप माझ्या लक्षात आहे.
ती झाडे फार उंच वाढतात.
सोनेरी सूर्यप्रकाश अंगाखांद्यावर घेऊन

सहस्र फांद्या हेलावून
अभिवादन करणारी झाडे...
तू त्यांचे बीज
आपल्या देशातून येताना
आणायचे विसरलास की...

.१०.

शहरातल्या काळ्या रस्त्यांवरून
घोडेस्वारांची पथके
शस्त्रे परजत फिरत आहेत.
कुंपणाआड उभ्या असलेल्या
फिकट आकृतींना सांधणाऱ्या
आंतरिक विश्वसंकेताच्या दुव्याने
त्यांच्याभोवती रिंगण धरले आहे...
रिंगणात घोडे
थयथयाट करीत खिंकाळतात...
भोवताली हा उन्हाळा पेटलेला असतानाच
आपल्या घरातल्या आरशाला
मोटमोठे तडे गेलेले...
घणघणणारा घंटानाद...

.११.

रेंगाळत गेलेल्या पावसाच्या सरींच्या कथा
तू मला सांगण्यापेक्षा
त्या पलीकडच्या स्थिरचित्त टेकड्यांना
का सांगत नाहीस ?

ह्या अशांत वेळी
कौलारातून उतरणाऱ्या
उद्याच्या काळ्या सावल्या
माझ्याभोवती फेर धरतात...
आणि त्या घनगर्द काळोखात
मला तुझे ते अभयदायी ओठ
जाणवत नाहीत.

.१२.

पाखरे उडून गेल्यानंतरचा
शांततेचा कोलाहल
किती जीवघेणा असतो!
असहाय करून सोडणारा.
झाडे एकमेकांकडे बघून सुस्कारे टाकतात;
वाळूच्या रेताड अंगावर
सरसरून शहारे येतात.

.१३.

आताच्या माझ्या सर्वच आठवणींना
भगभगीत उन्हाळ्याचे
दडस अस्तर लागते आहे...

नुस्तेच आपण सर्वजण
एकमेकांना पिळून काढत असू,
तर या आयुष्याला मनोरम का म्हणायचे?

चंडोल पक्ष्याच्या भरारीसारखी
तुझी ती हळवी गाणी
कुठे आहेत रे ?

—खोल्यांना निळे पडदे
लावण्यातले कौतुक
मला आता उरलेच नाही.

.१४.

रस्ताबांधणीची कामे
रात्रीच्या वेळी,
पावसाळ्यात-
हिवाळ्यात
करता येतील,
असे मी कुणालाच सुचवू शकत नाही.
—ह्या धुंगुरवाळ्या सांजप्रवाहाला
कुणा भाग्यवंताची नजर लागली...!

.१५.

विजेच्या दिव्यांच्या प्रकाशात
मांडलेली चकचकीत दुकाने;
रस्तोरस्ती
काठोकाठ वहाणारा व्यापार...
—संध्याकाळ ही ज्या फुलांची
उमलण्याची वेळ आहे
त्यांना सकाळी कोमेजावेच लागते.

बोलत का नाहीस ?
कसल्या ह्या गतिमान चक्रात
हात अडकवून बसलो आहोत आपण...

.१६.

हे असे दुभंग होऊन जगायचे
तुझ्यासुद्धा तेव्हा मनात नव्हते,
हे मला आठवत नाही
असं का तुला वाटतंय ?
पण मी तरी कुठे जाणूनबुजून...

हिंस्र रात्रीतून पडणाऱ्या स्वप्नातील
निळ्या उन्हाचे संदर्भ
मी दिवसाढवळ्या देऊ शकत नाही, हेच खरं !

हिवाळ्यातल्या एका रात्रीतून
बठलेल्या पळसाला फुटलेल्या उन्मत्त बहराची
ती आदिम लोककथा
तुला अद्याप आठवते आहे
यातच मला आता समाधान आहे.

.१.

अंगभर सळसळत जाणाऱ्या घोड्यांच्या टापा,
नवनवोन्मेशशालिनी पालवी अंगांगावर;
—मी कुठवर आवरून धरू स्वतःला
या नैसर्गिक ऊर्मीच्या दशेत—
जीवाची नुस्ती तगमग होते.

निश्चयाने कुदळ उचलली
नि अपशकुन झाला.

—वाऱ्याच्या झोताने हलणारे
हे चंचल घर मीच बांधले.
कुंपण नाहीच;
भोवताली हा ओसाड प्रांत.

.२.

हा सर्व ओसाड प्रांत
माझाच आहे.

खिडकीविषयी होय !
मुद्दाम कोण फुटक्या काचा बसवेल ?
दगड भिरभिरला आणि फुटली...
तेवढाच बाहेरच्या उन्हाचा
जिवंत, झळझळीत स्पर्शणारा कवडसा—
अग्निवासारखा.

छे ! दंडा घेऊन
राखण कोण करत बसेल !

—आणि एकच का दार आहे?
शिवाय गरजही काय म्हणा,
एकदा हा सर्वच ओसाड प्रांत
आपला म्हटल्यावर.

.३.

यंत्रवत हालचालींचे स्पष्टीकरण करत
तू म्हणालास,
"हे असे असणे अपरिहार्यच आहे
काही दिवसांनी,
आपल्या बागेतल्या झाडांना
अणकुचिदार दाते असलेली
चक्राकार फुले येतील,
तेव्हा त्या मउसर ओल्या काळोखात
तुझा आश्वासक हात
माझ्या हातात द्यायला विसरू नकोस."

.४.

रेडिओतून प्रेमाची गाणी गळत राहिली,
नि पडद्यावर त्याचे प्रात्यक्षिक—
नंतर मग रात्र झाली.

.५.

पहाटे जागी झाले.
कुठे रात्रीच्या खुणाच उमटलेल्या नव्हत्या.
घरभर हिंडून बघितले,
स्वतःशीच आठवून बघितले

तर तो दिवसाचाच एक भाग—
दिवसाचा पुढचा भाग पुढे चालू...

.६.

मी दिव्याखाली उभी,
अंगाखांद्यावरून ओसंडून वाहणारे
प्रकाशाचे स्रोत.
पायाखाली सावलीचे काळे वर्तुळ.
इथे येण्यापूर्वीच मला सांगण्यात आले
की वस्ती झपाटलेली आहे
आणि माणसांची नाही.
हे प्रयत्नपूर्वक मनावरून पुसत आणले.
आणि लंगडी घालत
स्वतःशीच खेळायला सुरवात केली.

.७.

वाळवंटात किंवा पाण्याखाली
बॉम्बच्या चाचण्या चालू असतील
तेव्हा पियानोवर एखादे विरहगीत
छेडायला काय हरकत आहे...

तसे प्रत्येकाच्याच मनात असतातच की
त्या जहरी स्फोटांचे अवशेष...
तेसुद्धा सर्व पुसत आणायचे
म्हणजे...

तशा आपल्या आभासमय
'असण्याच्या'

सर्वच पायऱ्या
कुठे ओलांडणार आहोत आपण ?

.८.

॥ मी नसता उगा म्हणावे;
आहे तसेच राहो.
असण्याच्या फोलामधला
दाणा गळून जावो ॥

REFBK-0023118
REFBK-0023118

अग्निमण्यांच्या शोधात
पृथ्वीच्या पाठीवरल्या कुठल्याही प्रदेशातून
प्रवासी निघाले
तरी ते शेवटी
असंख्य चंद्र जेथे दररोज कोसळून पडतात
त्या घोर शोकदरीपाशीच
येऊन पोहोचतात. हमखास.

... ... ...

एकेकदा माझी नखं
अतोनात वाढत जातात
हिंस्रपणा नुसता अंगभर धुमसत राहतो.
अंगावरच्या पायघोळ झग्याच्या खिशात
पृथ्वीला लावायची तरफ टाकून
मी तोंडाने विश्वात्मक शांततेविषयी
प्रवचने देत हिंडते—
॥ सहज शक्यतेनुसार लोकलमध्ये खिसा कापला जातो ॥

... ... ...

चिरायू होवोत हे भेदाभेद नि संघर्ष
सरकू देत शतकामागून शतके ..

आपल्या मनात असतो तोच खरा
आकड्यांचा अर्थ.

... ... ...

हे सर्व तत्त्वज्ञान
मी अखेर माझ्या मातीच्याच हातांनी
तुला सांगत आहे.